**ठळक बातम्या**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा हवाईदल जवानांशी संवाद
- ऑरपेशन सिंदूर स्थगित केलं आहे, मात्र दहशतवादाशी लढा सुरूच राहील, असा प्रधानमंत्र्यांचा स्पष्ट संदेश
- जम्मू काश्मीरमधल्या शोपियान जिल्ह्यात आज सकाळी झालेल्या चकमकीत तीन दहशतवादी ठार
- केंद्रीय शिक्षण मंडळाच्या १२वीच्या परीक्षेचा आणि महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाच्या १०वीच्या परीक्षेचा निकाल जाहीर / दोन्हीकडे उत्तीर्णात मुलींचं प्रमाण जास्त

**आणि**

- आयपीएल क्रिकेट सामने येत्या शनिवारपासून पुन्हा सुरु होणार

**<><><><><>**

प्रधानमंत्री  नरेंद्र मोदी यांनी आज पंजाबमधे आदमपूर इथं हवाईदलाच्या तळाला भेट दिली आणि तिथं हवाई दलाच्या जवानांशी संवाद साधला. सेनादलांच्या जवानांबद्दल देशाला कृतज्ञता असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. आणि जवानांचं मनोबल वाढवलं. तिथल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्रधानमंत्र्यांना सद्यस्थितीविषयी सविस्तर माहिती दिली.

**<><><><><>**

भारतानं 'ऑपरेशन सिंदूर' स्थगित केलं आहे; ते थांबवलेलं नाही, दहशातवादाविरुद्धची लढाई चालूच राहील, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी काल केलं. दहशतवादाला खतपाणी घालणारं सरकार आणि दहशतवादी संघटना वेगवेगळ्या नसून पाकिस्तानच्या हालचालींवर भारताचं लक्ष आहे, असं त्यांनी सांगितलं. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारतानं पाकिस्तानला सडेतोड प्रत्युत्तर दिलं; त्यानंतर प्रथमच प्रधानमंत्र्यांनी काल राष्ट्राला संबोधित केलं. एकीकडे प्रत्येक भारतीय नागरिकाला सुरक्षिततेबाबत आश्वस्त करतानाच त्यांनी पाकिस्तानला कठोर इशाराही दिला आणि संपूर्ण जगाला भारताची ठाम भूमिका ठणकावून सांगितली. दहशतवादाच्या विरोधात भारताची कठोर कारवाई यापुढेही सुरूच राहील, तसंच अण्वस्त्र हल्ल्याच्या धमकीला भारत अजिबात भीक घालणार नाही; असं त्यांनी सांगितलं. असं ते म्हणाले.....

**होल्ड...**

*(ऑपरेशन सिंदूर ने आतंक के खिलाफ लड़ाई में एक नई लकीर खींच दी है, एक नया पैमाना, न्यू नॉर्मल तय कर दिया है। पहला- भारत पर आतंकी हमला हुआ तो मुंहतोड़ जवाब दिया जाएगा। हम अपने तरीके से, अपनी शर्तों पर जवाब देकर रहेंगे। हर उस जगह जाकर कठोर कार्यवाही करेंगे, जहां से आतंक की जड़ें निकलती हैं। दूसरा- कोई भी न्यूक्लियर ब्लैकमेल भारत नहीं सहेगा। न्यूक्लियर ब्लैकमेल की आड़ में पनप रहे आतंकी ठिकानों पर भारत सटीक और निर्णायक प्रहार करेगा। तीसरा- हम आतंक की सरपरस्त सरकार और आतंक के आकाओं को अलग-अलग नहीं देखेंगे। ऑपरेशन सिंदूर के दौरान, दुनिया ने, पाकिस्तान का वो घिनौना सच फिर देखा है, जब मारे गए आतंकियों को विदाई देने, पाकिस्तानी सेना के बड़े-बड़े अफसर उमड़ पड़े। स्टेट स्पॉन्सर्ड टेरेरिज्म का ये बहुत बड़ा सबूत है। हम भारत और अपने नागरिकों को किसी भी खतरे से बचाने के लिए लगातार निर्णायक कदम उठाते रहेंगे।)*

**<><><><><>**

संरक्षणमंत्री राजनाथ सिंग यांनी आज नवी दिल्ली इथं  झालेल्या उच्च स्तरीय बैठकीत  देशाच्या पश्चिम सीमेच्या सुरक्षा परिस्थितीचा आढावा घेतला. या बैठकीला संरक्षण प्रमुख जनरल अनिल चौहान, नौदल प्रमुख ॲडमिरल दिनेश के त्रिपाठी, लष्कर प्रमुख जनरल उपेंद्र  द्विवेदी आणि  हवाई

दलाचे उपप्रमुख एअर मार्शल नर्मदेश्वर तिवारी तसंच संरक्षण सचिव राजेश कुमार सिंग हे उपस्थित होते.

**<><><><><>**

भारत आणि पाकिस्तान यांच्यात काल सैनिकी कारवाई महासंचालक स्तरावर चर्चा झाली. या चर्चेत दोन्ही बाजूंच्या सैन्याकडून बंदूकीची एकही गोळी झाडली जाता कामा नये, तसंच एकमेकांविरुद्ध कोणतीही आक्रमक कारवाई केली जाऊ नये, यावर सहमती झाल्याचं भारतीय लष्करानं आपल्या निवेदनात म्हटलं आहे. सीमेवर सैन्य कमी करण्यासाठी तात्काळ उपाययोजना करण्यालाही दोन्ही देशांच्या लष्करानं संमती दर्शवली आहे. दरम्यान सीमावर्ती भागात एवढ्यात शत्रूचे कोणतेही ड्रोन आढळल्याची माहिती नाही. परिस्थिती शांत आणि पूर्ण नियंत्रणात आहे, असं भारतीय लष्कराकडून सांगण्यात आलं.

**<><><><><>**

जम्मू काश्मीरमधल्या शोपियान जिल्ह्यातल्या शुकरू केल्लर वन विभागात संरक्षण दल आणि दहशतवादी यांच्यात आज सकाळी झालेल्या चकमकीत तीन दहशतवादी ठार झाले. हे दहशतवादी लष्कर ए तैयबा किंवा द रेझिस्टन्स फ्रंट चे सदस्य असल्याची शक्यता काश्मीरचे पोलीस महानिरीक्षक व्ही के बिर्दी यांनी वर्तवली आहे. या भागात दहशतवादी लपल्याची माहिती मिळाल्यानंतर लष्कर आणि केंद्रीय राखीव पोलिस दलानं शोध मोहीम सुरू केली होती. संरक्षण दलाचे जवान संशयित ठिकाणी पोहोचताच दहशतवाद्यांनी गोळीबार सुरू केला, त्यानंतर चकमक सुरू झाली.

**<><><><><>**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे फेब्रुवारी आणि मार्च महिन्यात घेतलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा म्हणजेच इयत्ता दहावीचा निकाल आज मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांनी पुण्यात जाहीर केला. यंदा या परीक्षेत ९४ पूर्णांक १० शतांश टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.यावर्षीही मुलांच्या तुलनेत मुली उत्तीर्ण होण्याचं प्रमाण अधिक आहे. यंदाही कोकण विभागाचा निकाल सर्वाधिक म्हणजे ९८ पूर्णांक ८२ शतांश टक्के इतका आहे. तर सर्वात कमी निकाल हा नागपूर विभागाचा लागला असून त्याची टक्केवारी ९० पूर्णांक ७८ शतांश टक्के इतकी आहे. पुणे विभागाचा निकाल ९४ पूर्णांक ८१ शतांश टक्के इतका आहे. दहावीच्या नियमित परीक्षेसाठी यंदा राज्यातील नऊ विभागीय मंडळातून १५ लाख ४६ हजार ५७९ नियमित विद्यार्थी बसले होते, त्यापैकी १४ लाख ५५ हजार ४३३ जण उत्तीर्ण झाले आहेत. गेल्यावर्षी पेक्षा यंदाच्या निकालात १ पूर्णांक ७१ शतांश टक्क्यांनी घट झाली आहे. यावर्षीही मुली उत्तीर्ण होण्याचं प्रमाण अधिक असून त्याची टक्केवारी ९६ पूर्णांक १४ शतांश टक्के इतकी आहे. तर ९२ पूर्णांक ३१ शतांश टक्के इतकी मुलं उत्तीर्ण झाली आहेत. हा निकाल एक वाजल्यापासून मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध झाला आहे.

**<><><><><>**

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळानं इयत्ता १२ वीचा निकाल आज जाहीर केला. यावर्षी ८८ पूर्णांक ३९ शतांश टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. गेल्यावर्षीच्या तुलनेत यंदा निकालाच्या टक्केवारीत किरकोळ वाढ झाली

आहे. यावर्षीही मुली उत्तीर्ण होण्याचं प्रमाण अधिक आहे. यंदा सीबीएसईच्या १२ वी च्या परीक्षेला एकूण १६ लाख ९२ हजार ७९४ विद्यार्थी बसले होते. विद्यार्थ्यांना त्यांचा निकाल cbse.gov.in, results.nic.in, results.digilocker.gov.in या संकेतस्थळांवर बघता येईल.

**<><><><><>**

'ऑपरेशन सिन्दूर' बाबत जनजागृतीच्या उद्देशानं भारतीय जनता पक्षानं आजपासून देशभरात जनजागृती मोहिम हाती घेतली आहे. या मोहिमेला त्यांनी 'तिरंगा यात्रा' असं नाव दिलं असून पाकिस्तानविरोधात भारतीय लष्करानं केलेल्या यशस्वी कारवायांवर प्रकाश टाकण्यात येणार आहे. राजधानी दिल्लीतल्या कर्तव्यपथावर आज संध्याकाळी विशेष कार्यक्रमाचे आयोजन केलं आहे.

**<><><><><>**

प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने एअर इंडिया आणि इंडिगो या विमान कंपन्यांनी जम्मू, लेह, जोधपूर, अमृतसर, भुज, जामनगर, चंदीगड आणि राजकोट इथली विमान उड्डाण सेवा आज रद्द केल्या आहेत. दिल्ली विमानतळावरून नियमित उड्डाणं होत आहेत. मात्र, बदलत्या हवाई परिस्थितीमुळे आणि नागरी विमान वाहतूक सुरक्षा विभागाने अनिवार्य केलेल्या वाढीव सुरक्षा उपायांमुळे, काही उड्डाण वेळापत्रकांवर परिणाम होऊ शकतो, असं या विमान कंपन्यांनी आपल्या समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. वेळापत्रकांवरच्या परिणामामुळे चेक-इन प्रक्रियेला विलंब होण्याची शक्यता असून संबंधित विमान कंपन्यांच्या अधिकृत

संकेतस्थळांवर आपल्या उड्‌डाणाची वेळ तपासण्याचं आवाहन विमान कंपन्यांनी केलं आहे.

<><><><>

संयुक्त राष्ट्रांनी इराणच्या यापूर्वीच्या अण्वस्त्र कार्यक्रमात सहभागी असलेल्या तीन इराणी नागरिकांना तसंच, एसपीएनडी या संस्थेशी संबंधित एका इराणी गटावर निर्बंध लादले आहेत. ओमानमध्ये झालेल्या अमेरिका - इराण अण्वस्त्र चर्चेनंतर हे पाऊल उचलण्यात आलं आहे. इराणसाठी अण्वस्त्रांशी संबंधित सामग्री मिळवताना देशातल्या आघाडीच्या कंपन्यांचा वापर केल्याचा आरोप या नागरिकांवर आणि इराणी गटावर आहे.

<><><><>

भारतातून अमेरिकेत निर्यात पोलाद आणि ॲल्युमिनियमवर अतिरिक्त शुल्क लादलं गेल्यानंतर त्याला प्रत्युत्तर देण्याचा प्रस्ताव भारतानं मांडला आहे. जागतिक व्यापार संघटनेसमोर हा प्रस्ताव ठेवताना अमेरिकेने शुल्क लादण्याचा घेतलेला निर्णय हा १९९४च्या व्यापार आणि शुल्कासंबंधित कराराशी सुसंगत नसल्याचं भारताने स्पष्ट केलं आहे.

<><><><>

भारतीय क्रिकेट नियामक मंडळ-बीसीसीआयनं आयपीएल स्पर्धेचं सुधारित वेळापत्रक जाहीर केलं आहे. या वेळापत्रकानुसार येत्या शनिवारी म्हणजे १७ मे पासून पुन्हा एकदा आयपीएल स्पर्धेला सुरुवात होणार आहे.

//<><><><>//